# Corning Incorporated इंटरनेट डेटा संरक्षण सूचना

Corning Incorporated (“Corning,” “आम्ही,” “आमचा,” “आमची”) आपले ऑनलाईन डेटा संरक्षणाचे सुरक्षा उपाय करण्यास कटिबद्ध आहे. आपल्या Corning च्या संकेतस्थळाच्या वापरादरम्यान आपल्या वैयक्तिक डेटावर कशी प्रक्रिया केली जाईल याची रूपरेषा खाली दिली आहे.

आपण सादर करता तो सर्व वैयक्तिक डेटा Corning Incorporated द्वारा संग्रहित केला जातो, व तो आपल्या रहिवासाच्या देशात असलेल्या एक वा अधिक स्थानिक Corning प्रभागा(गां)शी शेअर केला जाईल (संग्रहण फॉर्मवर आपण काय पुरवले त्यावर अवलंबून). Corning Incorporated व संबंधित स्थानिक Corning प्रभाग दोघेही (यापुढे एकत्रितपणे “Corning” असे संदर्भित) आपल्या Corning च्या संकेतस्थळाच्या वापरातून संग्रहित केला जाणाऱ्या आपल्या वैयक्तिक डेटासंदर्भात एकत्रित डेटा नियंत्रक म्हणून कार्य करत आहेत. सर्व संबंधित Corning प्रभागांची नावे व संपर्क तपशील पाहण्यासाठी कृपया खालील दुव्यावर क्लिक करा

**http://www.corning.com/media/worldwide/global/documents/datacontrollers.pdf**

Corning समूहादरम्यान हस्तांतरण होताना वैयक्तिक डेटाचे संरक्षण होत असल्याची खात्री करण्यासाठी Corning ने **बंधनकारक कॉर्पोरेट नियम** (BCR) यांचा संच अमलात आणला आहे. BCRची अंमलबजावणी Corning युरोपीय आर्थिक क्षेत्र (EEU) प्रभागांकडून जगभरात असलेल्या अन्य EEU-बाह्य देशांमध्ये असलेल्या Corning प्रभागांकडे होणाऱ्या वैयक्तिक डेटा हस्तांतरणाला पुरेसे संरक्षण देते कारण त्यांचा मसुदा [1]सर्वसाधारण डेटा संरक्षण विनियम (“GDPR”) आवश्यकतांच्या अनुपालनानुसार केला गेला आहे. Corning च्या BCRच्या संमतीचे नेतृत्व फ्रेंच पर्यवेक्षक प्राधीकरण सीएनआयएल द्वारा केले गेले, ज्यात दुय्यम सहाय्य जर्मन स्टेट ऑफ हेसेन व पोलंडच्या पर्यवेक्षक प्राधीकरणाने दिले.
आमच्या व्यवसायातील बदल प्रतिबिंबित होण्यासाठी व आपली अधिक चांगली सेवा करण्यासाठी आम्ही या सूचनेमध्ये वेळोवेळी बदल करू. या संकेतस्थळावर दर्शवणे, यांसारखे या सूचनेमधील कोणतेही असे बदल प्रसिद्ध करण्यासाठी Corning वाजवी प्रयत्न करेल. कोणत्याही बदलांची माहिती मिळण्यासाठी आपण या सूचनेचा वरचेवर आढावा घेतला पाहिजे. खाली दिलेल्या सूचनेच्या तारखेची कृपया नोंद घ्या, म्हणजे तिचे शेवटचे अद्यतन कधी झाले हे आपल्याला कळेल.

Corning तुमच्या Corning.com व संबंधित Corning संकेतस्थळांवरील डेटाचे संरक्षण खालील मूलभूत तत्वे वापरून करते:

## i. वैयक्तिक डेटाचे संग्रहण व वापर

या संकेतस्थळाद्वारा आपली आणि आपल्या ऑनलाईल पसंत्या व अपेक्षा यांबाबत Corning माहिती संग्रहित करत असेल तेव्हा आपल्याला सूचित केले जाईल व ती माहिती कशी वापरायची आहे ते स्पष्ट केले जाईल.

[1] वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करणे व अशा डेटाची मुक्त हालचाल याबाबत नैसर्गिक व्यक्तींचे संरक्षण (सर्वसाधारण डेटा संरक्षण विनियम) व निदेश 95/46/EC रद्द करणारा युरोपीय संसद व कौन्सिल यांचा 27 एप्रिल 2016 चा विनियम (EU) 2016/679;

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

आपण आम्हाला पुरवल्याशिवाय आमचे वेब सर्व्हर ई-मेल पत्ते संग्रहित करत नाहीत. तथापि जोडणी सुरू होते तेथील आयपी पत्ता व डोमेन नाव यासारखी सर्वसाधारण केलेली माहिती आम्ही संग्रहित करतो. पाहिलेली पृष्टे, साईटवर व्यतीत केलेला काळ, भेटींची संख्या व तत्सम माहितीच्या मोजदादीसाठी ही माहिती एकत्रितपणे वापरली जाते. या संकेतस्थळाच्या सामग्रीत सुधारणा करण्याच्या आमच्या वैध उद्देशाच्या अनुपालनाला अनुसरून ही माहिती आम्ही वापरतो.

**त्या व्यतिरिक्त,** या संकेतस्थळात सुधारणा करण्याच्या आमच्या वैध स्वारस्यावर आधारित, आपल्या भेटीचे रेकॉर्ड ठेवण्यासाठी आम्ही विविध प्रकारच्या "कुकी" वापरतो. Corning वापरत असलेल्या कुकींचे प्रकार, त्या कशा वापरल्या जातात व त्यांचा वापर मर्यादित करण्यासाठीचे आपले पर्याय याबाबत अधिक माहितीसाठी कृपया **येथे क्लिक करून** Corning कुकी धोरणाचा आढावा घ्या.
(Corning चे **कुकी धोरण** वर्णन करत असलेल्या) अत्यावश्यक कुकींद्वार संग्रहित केलेली माहिती वगळता, आपण अशी माहिती देऊ इच्छिता की नाही, याची निवड आपण करू शकाल. उदाहरणार्थ, कुकींद्वारा संग्रहित केलेली काही माहिती मार्केटिंग उद्देश वा संकेतस्थळ ट्रॅफिकचा माग व अहवाल यांसाठीही वापरली जाऊ शकते. आपण काही माहिती न देण्याचे निवडल्यास, Corning सोबत आपण निवडलेल्या व्यवसाय कृतीत पुढे जाणे आपल्याला कदाचित शक्य होऊ शकणार नाही, याची कृपया जाणीव असू द्या.

आपण आम्हाला नावे, पत्ते, फोन क्रमांक, ई-मेल पत्ते इ. सारखी माहिती (उदा. संकेतस्थळाच्या संपर्क फॉर्मद्वारा दिलेली) पुरवता, तेंव्हा आमचे आपल्याशी नाते राखणे व सुधारण्यातील आमच्या वैध स्वारस्यावर आधारित, आम्ही ती फक्त आपल्या चौकशांना प्रतिसाद देणे व वापरकर्त्या प्रस्थापित ऑनलाईन खात्यांचे व्यवस्थापन, तसेच आवश्यक तेव्हा आपल्याकडून घेतलेल्या संमतीनुसार विशिष्ट Corning मार्केटिंग कृती, घटना वा सेवांसाठीच वापरू

लबाडीचे ईमेल ओळखणे व अडवण्याच्या आपल्या वैध स्वारस्यावर आधारित, अभ्यागतांनी पाठवलेली इलेक्ट्रॉनिक संप्रेषणे राखण्याचा हक्क Corning राखून ठेवते. या उद्देशासाठी, ई-मेल फॉरवर्ड करणे व ई-मेल देवाणघेवाण लॉग करण्याचे विशिष्ट तंत्रज्ञानही Corning वापरते. ई-मेल देवाणघेवाण लॉगमध्ये समावेश असतो: संदेशाची तारीख व वेळ; ई-मेल पाठवण्यासाठी वापरलेल्या साधनाचे नाव व आयपी पत्ता; मूळ संदेश पाठवणाऱ्याचा ई-मेल पत्ता; व Corning प्राप्तीकर्ता पत्ता

### ii. <u>उघड करणे</u>

आपल्याबाबत संग्रहित केलेली कोणतीही माहिती संरक्षित ठेवली जाईल व Corning च्या स्वतःच्या मार्केटिंग कृती व साईट पाठबळाच्या उद्देशाने Corning सहयोगी वा सेवा प्रदाता यांचा अपवाद वगळता आपण शेअर करण्याची पूर्वपरवानगी दिली नसल्यास तृतीय पक्षांशी शेअर केली जाणार नाही. तथापि, न्यायालयाचे हुकूम, साक्षहुकूम, सरकारी वा कायदा अंमलबजावणी विनंत्या यांच्या अनुपालनासाठी आवश्यक समजेल तितका, वा Corning वा Corning सहयोगी यांची मालकी संपादन, विलिनीकरण, मालमत्तांची विक्री इ. केले गेलेल्या तृतीय पक्षाकडे वैयक्तिक डेटा Corning ला उघड करावा लागू शकतो.

Corning सहयोगी वा सेवा प्रदाता यांच्याशी अशी माहिती शेअर करण्यासाठी आपण पुरवलेली माहिती अन्य देशांमध्ये हस्तांतरण करण्याचा हक्क Corning राखून ठेवते. आपला वैयक्तिक डेटा अनधिकृत वा अयोग्य परवेशापासून संरकतकषत करण याच या वाजवी उददेशाने आम ही सुरकषा उपाय राखतो.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

जेथे आपल्या वैयकक्ततक डेटावर प्रकरक्रया करण्यात युरोकतपयन युकतनयनबाहेर डेटा हस्तांतरण समाकतवषट आहे, तेथे हस्तांतरणे GDPR अनुपालन करून केली जातात याची खात्री Corning करते. EUबाह्य Corning विभागांमधील वैयक्तिक डेटाचे हस्तांतरण ग्रुपच्या स्वतंत्र कॉर्पोरेट नियमांच्या अधीन आहे, तर EU बाहेरील तृतीय पक्ष प्रदात्यांना हस्तांतरण योग्य करार सुरक्षा उपायांनी संरक्षित केले जाते जसे की EU कॉन्ट्रॅक्ट्स फॉर कॉन्ट्रॅक्ट क्लॉज किंवा प्रोसेसरसाठी BCR. खालील "आमच्याशी संपर्क साधा" विभागात सूचीबद्ध केलेल्या Corning ग प्रायव्हसी ऑफिसशी संपर्क साधून तुम्ही अशा दस्तऐवजांच्या प्रतीची विनंती करू शकता.

### iii. जतन करणे

Corning ने प्रक्रिया केलेला आपला वैयक्तिक डेटा अशा स्वरूपात ठेवला जातो जो आपली ओळख तो वैयक्तिक डेटा ज्या उद्देशांनी प्रक्रिया केला त्यासाठी आवश्यक काळाहून अधिक काळ करू देणार नाही. आपल्या डेटाचा डेटा जतन करणे कालावधी ठरवण्यासाठी आम्ही खालील निकष वापरतो:

- जेथे आपण खाते तयार करता, तेथे आपण आधी काढून टाकण्याचे आम्हाला आवश्यक करत नाही तोपर्यंत आम्ही आपला वैयक्तिक डेटा स्थानिक कायदा व मार्गदर्शनाबरहुकूम व्याख्या केल्यानुसार कृतीहीनतेच्या कालावधीनंतर ठेवतो;
- आपण चौकशीसाठी आमच्याशी संपर्क साधता, तेंव्हा आपल्या चौकशीवर प्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या कालावधीपुरता आपला वैयक्तिक डेटा आम्ही ठेवतो;
- आपण थेट मार्केटिंगसाठी संमती दिली असेल तेथे आपण अनसब्स्क्राईब करत नाही वा आधी काढून टाकण्याचे आम्हाला आवश्यक करत नाही तोपर्यंत वा स्थानिक विनियम व मार्गदर्शनाबरहुकूम व्याख्या केल्यानुसार कृतीहीनतेच्या (ब्रांड्ससोबत सक्रिय इंटरॅक्शन नसणे) कालावधीनंतर आम्ही आपला थेट मार्केटिंगसाठी वापरलेला वैयक्तिक डेटा ठेवतो. त्या केसमध्ये, आम्ही फक्त स्थानिक विनियम व मार्गदर्शनाबरहुकूम आपला आक्षेप घेण्याचा हक्क हाताळण्यासाठी आवश्यक माहिती ठेवू व आपण ग्राहक असल्यास आम्ही आपला वैयक्तिक डेटा ठेऊ शकतो, पण फक्त ग्राहक व्यवस्थापन उद्देशासाठी
- आपल्या संगणकावर कुकी ठेवल्या जातात तेथे, आम्ही स्थानिक विनियम व मार्गदर्शनाबरहुकूम ठरवलेल्या कालावधीसाठी ती ठेवतो.

### iv. आपले अधिकार

Corning प्रक्रिया करत असलेल्या वैयक्तिक डेटात तुम्हाला प्रवेश मिळवण्यास अनुमती दिली जाते व जेथे चूक आहे तेथे ती माहिती दुरुस्त, सुधारित, वा काढण्याच्या वाजवी विनंत्या तुम्ही करू शकता.

आमच्या डेटाबेसमधील आपला वैयक्तिक डेटा काढून टाकण्याचे वा संपूर्णपणे निनावीकरण करण्याचे निवडल्यास, या इंटरनेट संरक्षण सूचनेच्या अनुपालनाचा पुरावा म्हणून आपल्या काढून टाकण्याच्या विनंतीचे रेकॉर्ड तसेच काढून टाकलेल्या माहितीच्या प्रकाराचे रेकॉर्ड आम्ही ठेऊ शकतो.

आपल्या वैयक्तिक डेटाची पोर्टेबलिटी प्राप्त करण्याचे वा आपल्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यावर निर्बंध घालण याच या कतवनंतीचे आपल या अकतधकारांचेही आपण कार्यान्वयन करू शकता.

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

त्या व्यतिरिक्त, Corning तिच्या वैध स्वारस्यावर आधारित, केंव्हाही आपल्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करते तेंव्हा आपल्या विवक्षित स्थितीशी संबंधित वैध कारणांसाठी आपण अशा प्रक्रिया करण्याला कोणत्याही वेळी आक्षेप घेऊ शकता.

त्या व्यतिरिक्त, आपण कोणत्याही वेळी आमच्या थेट मार्केटिंग संप्रेषणातून बाहेर पडू वा अनसबस्क्राईब करू शकता. आम्ही आपल्याला पाठवतो त्या कोणत्याही मार्केटिंग संबंधित ईमेल वा संप्रेषणातील "अनसबस्क्राईब" दुवा वापरून असे करणे सोपे पडते. अन्यथा, आपण खालील संपर्क तपशील वापरून आमच्याशी संपर्क साधू शकता.

Corning "स्पॅमिंग" (अवांछित प्रमोशनल ई-मेल पाठवणे) प्रथेला समर्थन देत नाही, तसेच त्यात सहभागी होत नाही. आपल्याला Corning कडून असा संदेश प्राप्त झाला आहे असा आपला विश्वास असल्यास कृपया privacy@corning.com वर संपर्क साधा.

वरीलपैकी कोणत्याही विनंत्या सबमिट करण्यासाठी, कृपया आमच्याशी privacy@corning.com वर किंवा खाली दिलेल्या मेलिंग पत्त्यावर संपर्क साधा. आपले नाव व आपल्या वैयक्तिक डेटातील कोणत्याही बदलाबाबत स्पष्ट सूचना वा आमच्या डेटाबेसमधील आपली माहिती काढून टाकण्याची विनंती समाविष्ट करण्याची खात्री करा, व Corning आपल्या संदेशाला प्रतिसाद देईल. आम्ही आपली विनंती पूर्ण करू शकत नसल्यास, आम्ही योग्य कालावधीत त्यासंबंधी खुलासा आपल्याला पुरवू.

Corning लागू डेटा संरक्षण नियमांचे अनुपालन करत नसल्याचा आपल्याला संशय असल्यास पर्यवेक्षक प्राधीकरणाकडे तक्रार दाखल करण्याचा हक्कही आपल्याला आहे. त्याव्यतिरिक्त Corning च्या BCRमध्ये (व अधिक खासकरून लेख 5.1, 5.4, 6.3, 6.4 व परिशिष्ट 2 यांमध्ये) व Corning अधीन असलेली डेटा संरक्षण तत्त्वे आपल्याला मिळू शकतात व तृतीय पक्ष लाभार्थी म्हणून, ती अंमलात आणायला लावायचा आपल्याला अधिकार आहे. खरंच, आपल्या वैयक्तिक डेटावर क्रिया करण्यासंबंधात आपले कोणतेही नुकसान झाल्यास, आपल्याला दाद मागण्याचा व, सुयोग्य तेथे, सक्षम न्यायालयीन वा पर्यवेक्षक प्राधीकरणाकडून आदेशान्वये वा वापरल्यास अंतर्गत Corning तक्रार यंत्रणेने ठरवल्यानुसार भरपाई मिळवण्याचा हक्क आहे.

## v. बालकांचा वैयक्तिक डेटा

बालकाचे मातापिता वा कायदेशीर पालक यांच्या संमतीविना सोळा (16) वर्षे वयाखालील बालकांकडून Corning माहिती संग्रहित करू इच्छित नाही. सोळा (16) वर्षे वयाखालील बालकांनी फक्त त्यांचे मातापिता वा कायदेशीर पालक यांच्या पूर्वसंमतीनेच Corning ला माहिती सादर केली पाहिजे. आपल्या अपत्याने Corning ला वैयक्तिक डेटा सादर केला व अशी माहिती काढून टाकण्याची विनंती आपल्याला करायची असल्यास, कृपया खाली दिलेल्यानुसार आमच्याशी संपर्क साधा व अशी माहिती काढून टाकण्याचे वाजवी प्रयत्न आम्ही वापरू.
Corning संकेतस्थळांच्या आंतरराष्ट्रीय भेटदारांनी जाणीव ठेवली पाहिजे की आपली विनंती पूर्ण करण्यासाठी वैयक्तिक डेटा युनायटेड स्टेट्स वा जगभरातील अन्य स्थानी असलेल्या संगणकांवर हस्तांतरित होऊ शकतो.

## vi. वैयक्तिक डेटाला लागू होणारे संरक्षण उपाय

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.

वैयक्तिक डेटाच्या संरक्षण पातळीची खातरजमा करण्यासाठी जोखमीला सुयोग्य होणारे व खासकरून अपघाती वा अवैध विध्वंस, नुकसान, बदल, अनधिकृत उघड करणे वा त्यात अनधिकृत प्रवेश यांपासून वैयक्तिक डेटाच्या रक्षणाचे सर्व तंत्रिक व संस्थात्मक उपाय Corning अंमलात आणते. Corning द्वारा आमच्या सेवा प्रदात्यांवर याच पातळीचे संरक्षण कंत्राटाद्वारे लावले जाते.

## vii. विविध

Corning च्या संकेतस्थळं वर Corning डोमेन नावांखाली नसलेल्या वा Corning ची मालकी नसलेल्या अन्य संकेतस्थळांचे दुवे असू शकतात. हे दुवे केवळ आपल्या सोईसाठी पुरवलेले आहेत. Non-Corning संकेतस्थळं द्वारा लागू केलेली सामग्री, सुरक्षा वा डेटा संरक्षण प्रथा यांसाठी आम्ही जबाबदार नाही. या अन्य संकेतस्थळांवर वर्णन वा देऊ केलेली उत्पादने वा सेवांना Corning समर्थन वा हमी देत नाही.

Corning संकेतस्थळं द्वारा आपण Corning ला पुरवाल असा वैयक्तिक नसलेला डेटा प्रोप्रायटरी वा गोपनीय मानला जाणार नाही व अशी माहिती उघड होण्यापासून संरक्षण करण्याचे कोणतेही दायित्व Corning मानत नाही. अशी आपण पुरवता ती कोणतीही माहिती चौकशांना प्रतिसाद देण्यासाठी वा मार्केटिंग कृतींचा भाग म्हणून Corning वापरू शकते. पुढे, Corning ला अशी माहिती सादर केल्याने तशीच उत्पादने, सेवा, योजना वा कल्पना यांचा कोणत्याही उद्देशासाठी Corning द्वारा खरेदी, उत्पादन वा वापर यांवर कोणतीही मर्यादा येणार नाही व ही माहिती पुनरुत्पादन, वापर, उघड व वितरित करण्यास Corning मोकळे असेल.

## viii. आमच्याशी संपर्क साधा

या खाजगीयता सूचनेबाबत आपल्याला आपल्या अधिकारांचे कार्यान्वयन करायचे असल्यास वा आपल्याला कोणतेही प्रश्न वा टिप्पण्या असल्यास, कृपया आमच्याशी येथे संपर्क साधा:

Global Data Privacy Office
One Riverfront Plaza,
MP-HQ-01-E1E26A
Corning, NY 14831
(607) 974-9000
privacy@corning.com

© 2023 Corning Incorporated. All Rights Reserved.